**Shri. Laxmiraman Lahoti** President | **Shri. Ramesh Biyani** Secretary | **Dr.Wajid Chaus** M. Pharm, Ph. D. Principal

---

## राष्ट्रीय सेवा योजना

**National Service Scheme Special Camp Activities- 2023**

राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर उपक्रम - २०२३

विशेष वार्षिक शिबीर अहवाल

दि. २४ ते ३० जानेवारी २०२३

दि. २४ ते ३० जानेवारी २०२३ या कालावधीत दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, लातूर च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे “युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास" या विषया अंतर्गत मौजे नागझरी ता. लातूर जि. लातूर येथे सात दिवसीय निवासी विशेष वार्षिक युवक शिबीर पार पडले. या शिबीरात २५ स्वयंसेवक / स्वयंसेविका व ३ प्राध्यापकांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष पुढाकार घेतला. सदरील शिबीरात पुढील प्रमाणे विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.

दि. २४/ ०१/ २०२३ रोजी मौजे नागझरी यागावात स. ११:०० वा सर्व स्वयंसेवक / स्वयंसेविका व प्राध्यापकांचे आगमन झाले. त्यानंतर गावात स्वयंसेवकांनी जन जागरण रॅली मार्फत संवाद साधला.

दु.२:३०वा. सदर शिबीराचे उद्घाटन नागझरी गावचे सरपंच मा. श्रीराम साळुंके व उपसरपंच मा. शन्नोबी गफार शेख यांच्या हस्ते संपन्न झाले. शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस हे होते.

युवकांचे प्रभावी व्यक्तीमत्व घडवत असताना, युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर रा. से. यो. च्यामाध्यमातून होत असते. रा. से. यो. हे युवकांच्या व्यक्तीमत्व व राष्ट्राच्या जडणघडणीचे प्रभावी माध्यम आहे. युवक शिबीराच्या माध्यमातून घेतले जाणारे विविध उपक्रम युवकांमध्ये राष्ट्र उपयोगी संस्कार निर्माण करीत असतात असे प्रतिपादन उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी केले. यावेळी प्रा. ओम पाटील, प्रा. प्रतिक चिंचोले उपस्थित होते. सरपंच मा. श्रीराम साळुंके ,ग्रामसेवक परमेश्वरे .आर. एस., रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. कावळे प्रसाद तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरीक व शिबीरार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सायंकाळच्या सत्रात ग्रामस्थांशी चर्चा करुन शिबीरार्थीनी गावातील समस्या जाणून घेतल्या व शिबीरार्थी व गटविभागणी करून घेतली.

दि. २५/०१/२०२३ रोजी सकाळच्या सत्रात ग्रामस्वच्छता अभियाना अंतर्गत गावातील मंदिर परिसराची, नाल्याची व शाळेच्या परिसराची साफ सफाई करून शिबिरार्थ्यांनी श्रमदान करण्याचे कार्य

केले. तसेच ग्रामस्थांना स्वच्छते विषयी माहिती देऊन जनजागृती करण्याचे कार्य केले. त्यानंतर पशु आरोग्य शिबीराचे उद्घाटन उपसरपंच शन्नोबी गफार शेख यांच्या हस्ते झाले यावेळी सर्व शिबिरार्थ्यांनी गावात जाऊन पशु आरोग्य शिबीराची माहिती गावकऱ्यांना दिली व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. याप्रसंगी डॉ. आर. जे. पाटील व त्यांचें सहकारी यांनी पशु आरोग्य तपासणी व खुरकूत लसीकरण राबविण्यात आले. दुपारच्या सत्रात शिबीरार्थीसाठी जादुटोणा व अंधश्रद्धा निर्मूलन याविषयावर मा. माधव बावगे कार्याध्यक्ष अं. नि. स. लातूर यांचे प्रात्यक्षीक व व्याख्यान झाले.

अनिष्ट व अघोरी प्रथा, जादूटोणा व भूतबाधा इत्यादीं मुळे तसेच, भोंदूबाबा यांच्या कडून समाजातील सामान्य जनतेचे मानसिक, शारीरिक व आर्थिक नुकसान व शोषण होण्याच्या घटना फार मोठया संख्येने उघडकीस येत असून हे प्रमाण अत्यंत भयावह आहे. जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती, भोंदूबाबा यांचा आपल्याकडे अद्भुत व चमत्कारी उपाय किंवा शक्ती असल्याचा खोटा दावा आणि यांची समाज विघातक व नुकसानकारक कृत्ये यांमुळे समाजाची घडीच विस्कटण्याचा आणि अधिकृत व शास्त्रीय वैद्यकीय उपाय व उपचार यांवरील सामान्य जनतेच्या विश्वासाला तडा जाण्याचा धोका निर्माण झाला आहे आणि या अंधविश्वासामुळे व अज्ञानामुळे ते अशा भोंदूबाबा आणि जादूटोणा करणाऱ्या व्यक्तींचा आश्रय घेत आहेत. अशा परिस्थितीत, जादूटोणा करणाऱ्या या व्यक्ती, भोंदूबाबा यांच्या कुटिल कारस्थानांना बळी पडण्या पासून सामान्य जनतेला वाचवणे व अशा अनिष्ट परिणामांना परिणाम कारक रित्या आळा घालण्यासाठी आणि त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी व यानुकसानकारक प्रथा, परिपाठ व रुढी, तसेच जादूटोण्यावरील विश्वास आणि अशा इतर अनिष्ट अघोरी प्रथा यांचा प्रसार रोखण्या साठी उचित व कठोर सामाजिक व कायदे विषयक उपाय योजना केली पाहिजे असे प्रतिपादन मा. माधव बावगे यांनी केले.

सायंकाळच्या सत्रात शिबीरार्थी व ग्रामस्थ यांच्यात पाणी अडवा पाणी जिरवा व वृक्षारोपण याविषयावरती चर्चा झाली व त्यासंदर्भात उपाय योजना व अंमलबजावणी साठी आराखडा बनविण्यात आला.

दि. २६/०१/२०२३ रोजी सकाळच्या सत्रात योगासन शिबीरानंतर ७४ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने गावातील प्राथमिक शाळेमध्ये ध्वजारोहण रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रसाद कावळे यांच्या हस्ते झाले. ज्या संविधानाच्या अनुषंगाने आज देशात कार्य चालू आहे, तो मसुदा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांनी तयार केला. अनेक सुधारणा आणि बदलांनंतर, समितीच्या ३०८ सदस्यांनी २४ जानेवारी १९५० रोजी हस्तलिखित कायद्याच्या दोन प्रतींवर सह्या केल्या. त्यानंतर दोन दिवसांनी २६ जानेवारी १९५० रोजी तो देशात लागू करण्यात आला. आपण नेहमी आपल्या राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कां बाबत नेहमी चर्चा करतो पण त्याच बरोबर सर्वांनी सामाजिक बांधिलकी ठेवून समाजासाठी कार्य करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रा. प्रसाद कावळे यांनी यावेळी केले.

यानंतर, श्रमदान कार्यक्रम राबविण्यात आला, या बरोबरच विद्यार्थी व ग्रामस्थ यांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले, या अंतर्गत ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले व स्वच्छ भारत अभियानाचे महत्व पटवून देऊन ग्रामस्थांसोबत गावातील शाळा, मंदिर, ग्रामपंचायत, अंगणवाडी, स्वच्छतागृह आदींची स्वच्छता करून श्रमदानाचे कार्य केले. स्वयंसेवकांनी उत्स्फुर्तणे श्रमाची साधना करुन नागझरी गावातील लोकांसमोर एक आदर्श निर्माण केला. दुपारच्या बौद्धिक सत्रात "स्वामी विवेकानंद व त्यांचे विचार" याविषयावर दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील डॉ. सुनीता सांगोले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. श्रद्धेचा किंवा खऱ्या विश्वासाचा प्रचार हेच माझ्या जीवनाचे ध्येय. मनुष्याचा

विकास हेच शिक्षणाचे ध्येय असते अर्थात यामध्ये श्रद्धा आणि विश्वासाचे स्थान महत्त्वपूर्ण असतेच असते. मनुष्याचे शील आणि च्यारित्र निर्माण हे शिक्षणाचे महत्त्वाचे तत्त्व होय. मनुष्याच्या प्रवृत्ती आणि संस्कार मनुष्याच्या च्यारित्र निर्मिती साठी अत्यावश्यक असतात. त्याच्या प्रवृत्ती आणि संस्कार, त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या सवयी आणि स्वभाव बनतात. शिक्षणाद्वारे मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वात अशा प्रवृत्ती आणि संस्कार निर्माण झाल्या पाहिजेत, असे स्वामी विवेकानंदांचे आग्रही प्रतिपादन आहे. असे विचार डॉ. सुनीता सांगोले यांनी यावेळी मांडले. सायंकाळच्या सत्रात "बाल विवाह प्रतिबंधक व महिला सबलीकरण" याविषयावर डॉ. चंद्रकला भार्गव यांचे व्याख्यान झाले. या व्याख्यानात लहान वयात लादलेल्या गरोदरपणामुळे व प्रसूतीमुळे कायमचे अपंगत्व येऊ शकते. तसेच गर्भपात, कमी वजनाचे अर्भक, अकाली प्रसूती, अर्भक मृत्यू व उपजत मृत्यूची शक्यता वाढते. मातामृत्यूचे प्रमाण वाढते. अपरिपक्व वयातल्या विवाहात वधू-वरांची निवड माय-बाप करतात. मुला-मुलींच्या पसंती-नापसंतीचा विचार केला जात नाही. त्यामुळे रूप, बुद्धिमत्ता, पात्रता, वय इत्यादीतील विषमतेमुळे हे विवाह विजोड ठरतात.

कुटुंबातूनच महिलांना स्वावलंबी करण्याचे प्रोत्साहन व संधी उपलब्ध होतील, अशी व्यवस्था आणि मानसिकता निर्माण होणे गरजेचे आहे. वडिलोपार्जित संपत्तीवर मुलाप्रमाणेच मुलींचा समान वाटा असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.मुलीला लग्नात हुंडा देण्याऐवजी पालकांनी मुलींना मालकी हक्क द्यावा असे प्रतिपादन डॉ. चंद्रकला भार्गव यांनी केले.

दि. २७/०१/२०२३ रोजी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. लक्ष्मीकांत विठ्ठलराव उखरांडे यांनी गावकऱ्यांचे मधुमेह, रक्तदाब तपासणी व उपचार करण्यात आले त्याच बरोबर डॉ. रुपाली कांबळे यांनी दंन्त चिकित्सा तपासणी व उपचार करण्यात आले. रक्तदाब आणि मधुमेह या दोन्ही व्याधी ज्यांना असतील, त्यांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी. अतिलठ्ठ व्यक्तींमध्ये हे दोन्ही आजार बळावण्याची आणि वाढण्याची शक्यता अधिक असते.

रक्तदाब आणि मधुमेह या दोन्ही व्याधी ज्यांना असतील, त्यांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी. अतिलठ्ठ व्यक्तींमध्ये हे दोन्ही आजार बळावण्याची आणि वाढण्याची शक्यता अधिक असते. रक्तदाब आणि मधुमेह या दोघांना एकत्रितपणे अतितीव्र आजार म्हणूनही ओळखले जाते. मधुमेह व उच्च रक्तदाब होण्याची प्रमुख कारणे म्हणजे बदलती जीवनशैली, तंबाखूचे सेवन, असमतोल आहार, धूम्रपान, असमतोल आहार, मानसिक तणाव. भारतात सर्वसाधारणपणे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि पक्षाघात यांचे अनुक्रमे ६.२, १५.९, ३.७ आणि ०.१५ टक्के इतके प्रमाण आहे. त्यामुळे बदलत्या काळात या दोन्ही व्याधींवर नियंत्रण आणणे हे प्रमुख आव्हान असणार आहे असे प्रतिपादन डॉ. उखरांडे यांनी केले.

आरोग्य चांगलं रहावं म्हणून योग्य आहार, नियमित व्यायाम आणि पुरेशी झोप याबाबी आवश्यक असल्या तरी दातांचे आरोग्य चांगले नसेल तर इतर सर्व पथ्य पाळूनही शरीराला व्याधी जडू शकतात. त्यामुळे दातांची सुरक्षा अन् सुरक्षेसाठी दातांचे विकार होऊ नयेत म्हणून घ्यावयाची काळजी अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. साधारणपणे दातांचे विकार दोन प्रकारचे असतात. हार्ड टिश्यू (दात) आणि सॉफ्ट टिश्यू (प्रामुख्याने हिरड्या, ओठ, जीभ, इपिथेलियम म्हणजे तोंडाची त्वचा). यातील हार्ड टिश्यूचे विकार म्हणजे कीड, झीज, दात तुटणं तर सॉफ्ट टिश्यूचे विकार म्हणजे हिरड्यांना सूज येणं, तोंड येणं आणि मौखिक कॅन्सर. दातांचे काम म्हणजे चर्वण, काही शब्दांचे उच्चार आणि गाल, ओठ यांना आधार देऊन चेहेऱ्याला योग्य आकार देणं. याखेरीज दुधाच्या दातांचे काम असते पक्क्या दातांकरता पाया तयार करणं गरजेचे आहे असा सल्ला डॉक्टर रूपाली कांबळे यांनी दिला.

दुपारच्या सत्रात शिबीरार्थी व गावकऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सायंकाळच्या सत्रात शिबीरार्थींनी मतदार जनजागृती करण्यासाठी करावयाचे उपाय योजना याविषयावर चर्चा केली. मतदानाविषयी जनजागृती करण्यासाठी रॅली व पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करायलाच हवे ,व त्याचबरोबर आपला लोकप्रतिनिधी निवडून देत असताना त्याचे चारित्र्य व इमानदारी बघून त्याचे निवड करण्यात यावे अश्या आशयाचा संदेश पथनाट्यातून दिला.

याप्रसंगी प्रा. प्रसाद कावळे हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी ते म्हणाले, विधानसभा, लोकसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये एक चांगल्या प्रकारचा प्रशासन येण्यासाठी सर्व नागरिकांनी मतदानाचा अधिकार वापरला पाहिजे. त्याचबरोबर देशाची लोकशाही बळकट होण्यासाठी सर्व नागरिकांना आपला अधिकार व त्याचा वापर केला पाहिजे. जगात सर्वात मोठी लोकशाही असलेला देश हा भारत आहे. लोकसभा किंवा विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था त्यामध्ये संपूर्ण भारतातील नागरिकांनी हिरिरीने सहभाग घेऊन मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले पाहिजे. ज्यामुळे राष्ट्रहितासाठी एक चांगल्या प्रकारचा प्रशासन उभारणीसाठी मदत होईल असेही ते म्हणाले. याप्रसंगी प्रा. ओम पाटील, प्रा. प्रतिक चिंचोले, यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

दि. २८/ ०१/ २०२३ रोजी सकाळच्या सत्रात शिबीरार्थी व ग्रामस्थांनी श्रमदान व ग्रामस्वच्छता अभियानात राबवण्यात आले. त्यानंतर लगेचच डॉ. साकेब उस्मानी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली शिबिरार्थी व गावकऱ्यांकरीता आपत्ती व्यवस्थापन या संदर्भात प्रात्यक्षिक कार्यक्रम करण्यात आले. आपत्ती कधीही सांगून येत नाही. त्याचा सामना करण्यासाठी आपल्यालाच तयार असावे लागते. शालेय विद्यार्थीही याबाबत सतर्क असावे, यासाठी मौजे नागझरी येथे 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर प्रशिक्षण व मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

शालेय व महाविद्यालयीन जीवनात मुले मुली विविध विषयांचे प्रशिक्षण घेत असतात. आपत्तीबाबतही त्यांना योग्य प्रशिक्षण दिल्यास विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असे सांगत आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ विमोचन सेवा याविषयी प्रात्यक्षिकासह समजावून सांगण्यात आले. यात जखमी व्यक्तीस विना स्ट्रेचरच्या साहाय्याने उचलण्याच्या विमोचन पद्धती, घरातील वस्तूपासून पुराच्या पाण्यापासून वाचणे, रुग्णास मदत करणे, दुष्काळ परिस्थितीमुळे येणाऱ्या आपत्तीसाठी पूर्वतयारी आदी विषयावर मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच संबंधित अधिकारी यांनी आग व रासायनिक अग्निशामक या विषयावर मार्गदर्शन केले.

यानंतर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थ व शिबीरार्थींनी या रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद दिला. त्यानंतर घरोघरी जाऊन स्वयंसेवकांनी संसदीय लोकशाही मध्ये निवडणुकीला किती महत्व आहे. हे पथनाट्याव्दारे पटवून दिले. ज्या लोकांनी मतदार नोंदणी करून घेतली नाही त्यांना मतदार नोंदणी करण्याचे आव्हान करण्यात आले. सायंकाळच्या सत्रात स्वयंसेवकात नेतृत्व गुण विकसित व्हावा म्हणून "आयत्यावेळेचे भाषण" स्पर्धा ठेवण्यात आली. यामध्ये सर्व शिबीरार्थींनी सक्रीय सहभाग नोंदवला.

दि. २९/ ०१/ २०२३ रोजी सकाळच्या सत्रात वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर वृक्षारोपण करण्यात आले. दुपारच्या सत्रात ग्रामस्थ व शिबीरार्थी करिता "युवकांसमोरील अव्हाने" या विषयावर डॉ. संदीपान जगदाळे यांचे व्याख्यान झाले. आजच्याच नव्हे तर कुठल्याही काळातील तरुण पिढीसमोर आव्हाने असतातच. त्यामुळे प्रथम हे तरुणांनी ध्यानात घेणे गरजेचे आहे की ज्याप्रमाणे

'काल' तरुण असलेल्या आजच्या वृद्ध पिढीने त्यांच्यासमोरील आव्हाने पेलून जग पुढे आणले व अस्तित्व टिकवून धरले तसेच ते सुद्धा जरूर करू शकतात,त्यासाठी त्यांनी भीतीवर मात केली पाहिजे.

उपजीविकेचे आव्हान - अस्तित्वाचे पेलल्यावर दुसरे आव्हान म्हणजे स्वतःची व परिवाराची उपजीविका निर्माण करणे आणि तिला शाश्वत टिकवून ठेवणे. आज मितीला आपल्या देशात चित्र असे आहे की एकीकडे काही कामांना माणूस मिळत नाही नाही दुसरीकडे असंख्य माणसे बे-रोजगार बसून आहेत. हे नियोजन शून्यतेचे परिणाम पुसून काढायचे तर प्रत्येक तरुणाला मी केवळ माझ्याच गावात काम कारेन अशी भूमिका सोडावी लागेल (विशेषतः मराठी मंडळीमध्ये ही वृत्ती ज्यास्त प्रमाणात दिसते.) जिथे जाईन तिथे लोकांना आपलेसे करून मी सेवेतून माझे साम्राज्य निर्माण कारेन असा आत्मविश्वास स्वतःमध्ये जागविला पाहिजे.

अस्तित्वाचे आव्हान - जगातील जनसंख्या अतोनात वाढल्याने उपलब्ध नैसर्गिक संसाधने व अन्न यांच्यावर विलक्षण ताण येऊ लागला आहे. त्यांच्यावर ताबा मिळवण्याचा संघर्ष वाढत चालला आहे व त्यातून नवनवीन आजार-दुखणी-साथी -हिंसा यांचा सर्वत्र उद्रेक होत आहे. त्यापासून स्वतःचा बचाव करणे हे एक प्रमुख आव्हान असेल.

चारित्र्य संपन्नतेचे आव्हान - भारत अद्याप लोकसंख्या नियंत्रणाच्या आघाडीवर काही ठोस पावले उचलू शकलेला नाही,त्यातून इथल्या बेगडी धर्म निरपेक्षतेमुळे सर्व नागरिकांना अद्याप समान कायदे लागू नाहीत याचा गैर फायदा घेणाऱ्या वृत्तीचा पगडा तरुणांवर वाढत चालला आहे. अमुकने गुन्हा केला,त्याला शिक्षा झाली नाही,तमुकने मुलगी पळवली पण त्याला कायदा शिक्षा करू शकला नाही, अमुक कलावंताने तर थेट देशद्रोह्यांना साथ देऊनसुद्धा त्याची जन्मठेप चुकली आणि तरी अडाणी लोकांनी त्याच्या फिल्मी गांधीगिरीसाठी दाद दिली असे चित्र निर्माण झाल्याने देशात चारित्र्य संपन्नतेचा संबंध फक्त शाळा-कॉलेजमधील सर्टिफिकेटवरच उरेल की काय असे वाटू लागले आहे. चारित्र्यसंपन्नतेचे आव्हान झेलणे सोपे नाही ज्यातून पुन्हा या देशात छत्रपती शिवाजीमहाराज,संत ज्ञानेश्वर-तुकाराम, स्वामी विवेकानंद किंवा गुरु गोविन्दसिंग, गौतम बुद्ध किंवा अगदी अलीकडचे राष्ट्रपती कलाम पुन्हा जन्माला येतील! तसे होईपर्यंत तरुणांनी विकृतीला स्वीकृती न देणे हे सुद्धा मोठे यश मानावे लागेल.

त्याचबरोबर स्वयंसेवकांनी पथनाट्याद्वारे “पाणी अडवा पाणी जिरवा” हा संदेश दिला. पिण्याच्या पाण्यासाठी पाच-पाच किलोमीटर पायपीट करणारे गावकरी, चारा टंचाई आणि रोजगाराची शोधाशोध. ग्रामीण भागातील भयावह स्थितीने सर्वांचीच घालमेल सुरू आहे. सध्या अमर्याद पाणी उपशाला आपण जबाबदार आहोत, असे परखड भाष्य करणारे पथनाट्य गावोगाव गाजत आहे. किमान पाणी जिरवण्याच्या काही उपाययोजना केल्याच पाहिजे याचा बोध गावकरी घेत आहेत.

दुष्काळावर फक्त हळहळ व्यक्त करण्यापेक्षा लोकप्रबोधन करण्याच्या उद्देशाने जलयुक्त शिवार योजनेची माहिती सांगतानाच पाणी अडवा पाणी जिरवा असा महत्त्वाचा संदेश पथनाट्यातील कलाकार देत आहेत. पाणी टंचाईमुळे शेतकरी अडचणीत आहे. दरवर्षीचे पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी नैसर्गिक जलस्त्रोत अडविण्याचा संदेश शिबिरार्थी यांनी दिला.

दि. ३०/ ०१/ २०२३ सकाळच्या सत्रात शिबीरार्थी व ग्रामस्थांनी श्रमदान करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्यानंतर दुपारच्या सत्रात शिबीरार्थी साठी व ग्रामस्थांसाठी "औषधनिर्माण शास्त्र व व्यवसायिक शिक्षण” याविषयावर प्रा. प्रतिक चिंचोले यांचे व्याख्यान झाले. शिकण्याला काहीच अंत नसते, खरं तर शिकण्यासाठी वयाची कोणतीही पट्टी नसते. आपण दररोज नवीन गोष्टी शिकतो,

जरी आपण ते ओळखत असलो तरीही काही फरक पडत नाही. शिकवणे आणि प्रशिक्षण ही दोन सामान्य पद्धती आहेत ज्या बहुधा लोक चुकीच्या पद्धतीने बोलतात, परंतु वस्तुस्थिती अशी आहे शिक्षण मुख्यतः वर्गशिक्षणाशी संबंधित आहे, ज्यामध्ये निवडलेल्या कोर्सनुसार विद्यार्थ्यांना विविध विषयांचे सैद्धांतिक ज्ञान दिले जाते. उलट, प्रशिक्षण अशी एक प्रक्रिया आहे जी प्रशिक्षणार्थीमध्ये विशिष्ट कौशल्ये प्रदान करण्यात मदत करते, जेणेकरुन त्याला / तिला विशिष्ट नोकरीत किंवा कामात खास केले पाहिजे. आजकाल, प्रशिक्षण प्रत्येक व्यवसायासाठी अनिवार्य आवश्यकता आहे, आणि म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याला एखाद्या विशिष्ट व्यवसायात व्यावहारिकदृष्ट्या कसे कार्य केले जाते याबद्दलचे संपूर्ण ज्ञान मिळविण्यासाठी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. चला अध्यापन आणि प्रशिक्षण यातील फरक समजून घेण्यासाठी पुढे जाऊया असे प्रतिपादन प्रा. प्रतिक चिंचोले केले.

त्यानंतर प्रा. कोंडापुरे यांच्या अध्यक्षतेखाली शिबीराचा समारोप करण्यात आला. याप्रसंगी प्रा. कोंडापुरे यांनी सरपंच मा. श्रीराम साळुंके, उपसरपंच शन्नोबी गफार शेख, ग्रामसेवक परमेश्वरे व सर्व ग्रामस्थांचे केलेल्या सहकार्यासाठी आभार व्यक्त केले. त्याचबरोबर कोणत्याही ग्रामविकासाच्या उपक्रमासाठी गावकऱ्यांचा सक्रिय सहभाग असणे महत्वाचे आहे असे विचार मांडले.

**प्रा. प्रसाद कावळे**

कार्यक्रम अधिकारी, रा. से. यो.

**डॉ. वाजिद चाऊस**

प्राचार्य